भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः– ३१/०८/२०१६

**१) ग्राहकांची फसवणुक करुन पैश्याची उलाढाल केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३०/०६/०१३ रोजी ते ३०.०३.२०१६ दर. यातील आरोपी हा बॅक ऑफ इंडीया लघुशाखा आष्टी येथे वक्रांगी लिमिटेड कंपनी मुंबई मार्फत बिसीए चा एजन्ट असुन त्यांनी लोकानकडुन पैसे घेवुन त्यांचे बॅकेचे खात्यात त्यांचे नावावर पुरेपुर रुपये जमा न करता २,८८,३१८/–रु. ची स्वत:हा उचल करुन ग्राहकांची फसवणुक केल्याने फिर्यादी हर्षल दादाराम जायगाडे वय ३६ वर्ष, रा. शाखा प्रबंधक बॅक ऑफ इंडीया शाखा डोंगरी बुज. यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोटींग पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन शासकीय कर्मचा–याला शिविगाळ व धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९.०८.२०१६ रोजी १५.३० वा. दर. यातील फिर्यादी दत्ता हामजी जाधव वय ४१ वर्ष, रा. पवनी हा मागली गावाचे ग्राम सचीव असुन दि. २९ ०८.२०१६ चे १५.३० वा. दर. माहात्मा गांधी तंटा मुक्त गाव समीती निधी अतंर्गत तंटामुक्त समितीचे अध्यक्षाचे निवडणुक कामी ग्राम सभेचे आयोजन केले असता यातील तीन्ही आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ व २ यांनी प्रोसेडींग बुकाचे पाने फाडुन फिर्यादीचे अंगावर धावुन धक्का बुक्की, ढकलढुकल करुन आरोपी क्र. ३ याने टेंबलावरचा स्पिकर उचलुन मारण्यास धावला व तिघांनी शिविगाळ करुन तु मागली येथे कशी डयुटी करतोस ते आम्ही पाहुन घेवु अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,३२३,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) अवैधरित्या जनावरांना कोंबुन निर्दयतेची वागणुक देवून बिना पास परवाना वाहतुक करत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी ८.४४ वा. पुर्वी. यातील दोन्ही आरोपीतांनी आपआपल्या ताब्यातील वाहनात प्रत्येकी ०६ जनावरे असे एकुण १२ जनावरे कि. ६३,०००/–रु. चे समतेपेक्षा जास्त भरुन कोंडुन प्राण्यांना निदर्यतेची वागणुक देवुन बिना पास परवाना व कोणतेही वैदयकीय प्रमाण पत्रा शिवाय वाहतुक करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ११(१)(ड) प्रा.नी वा.का.सन १९९५ सह.कलम ९ प्राणि . सरंक्षण अधिनियम सहकलम ८३/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–**

अ) दिनांक ३०/०८/०१६ रोजी १३.३० वा. मिनीडोअर वाहन क्र. एमएच ३६ एफ ८०६२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन बस स्थानक समोर साकोली येथे सार्वजनिक रोडवर ऊभे करून येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. खडसे पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ३०/०८/०१६ रोजी १३.४५ वा. मिनीडोअर वाहन क्र. एमएच ३६/१६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन बस स्थानक समोर साकोली येथे सार्वजनिक रोडवर ऊभे करून येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. खडसे पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) **मोटार वाहन कायद्याखाली कारवाई**.:–

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०२ केसेस, अवैध प्रवासी ०१ केसेस तसेच ईतर वाहनांवरती ९७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.